MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

## काळा पैसा वापरला जात असल्यास माहिती देण्याचे आवाहन

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये काळा पैसा वापरला जात असल्याची माहिती, रोख रकमेचे वाटप, रोख रकमेची हालचाल याबाबत विश्वसनीय माहिती असल्यास ती नि:संकोच पणे द्यावी, असे आवाहन नागपूरच्या आयकर प्रधान संचालक कार्यालयाचे आयकर उपसंचालक (तपास) अनिल खडसे यांनी केले आहे. माहिती देणाऱ्याची ओळख गुप्त ठेवण्यात येईल, असेही त्यांनी म्हटले आहे.माहिती पाठविण्यासाठी टोल फ्री क्रमांक १८००-२३३-०३५५, १८००-२३३-०३५६, छायाचित्रे, व्हिडिओ इत्यादी पाठविण्यासाठी व्हाटसअप क्र. ९४०३३९०९८०, इमेल nagpur.addldit.invincometax.gov.in, nashik.addldit.invincometax.gov.in आहेत. निवडणुकी दरम्यान काळ्या पैशांचा वापर रोखण्यासाठी प्राप्तीकर विभागास सहकार्य करावे, असेही त्यांनी आवाहन केले आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -३० | गुरूवार दि.१७ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -30 | THURSDAY DT.17 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# 'आडा'तच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार?

# खांडेंच्या 'कुंडलीत' 'राजा' बनण्याचे योग

## राधाकृष्ण होके पाटलांच्या भूमिकेने रमेश आडसकर माजलगाव मतदार संघातून बाहेर तर बीड विधानसभेत राजेंद्र मस्के पेक्षा कुंडलिक खांडेना मराठ्यांची पसंती!


## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचा मीच उमेदवार! मी कोणाची शिफारस केली नाही; .माजी आ.राधाकृष्ण होके पाटील











माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव विधानसभेच्या मैदानात उतारण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून आमची प्रबळ दावेदारी आहे.पवार साहेबांच्या आशीर्वाद मिळाल्यास मीच उमेदवार राहणार आहे.असा आत्मविश्वास माजी आ.राधाकृष्ण होके पाटील यांनी व्यक्त केला. दरम्यान इतर कोणाच्या उमेदवारीची शिफारस मी पक्षाकडं केली नाही,असी माहितीही त्यांनी यावेळी प्रसिद्धी पत्रकातून दिली.

यावेळी दिलेल्या प्रसिद्धी पत्राकाद्वारे त्यांनी सांगितले कि, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दुभागल्या नंतर आम्ही पक्षाला बळकटी देण्याचे काम केले.इतर कोणात्याही गटाच्या प्रलोभाला बळी न पडता शरदचंद्रजी पवार यांच्या अडचणीच्या काळातही मी सक्षमपणे पक्षासोबत उभा राहिलो. मागच्या ३५ वर्षापासून कार्यकर्ता म्हणून काम करत आहे.पवार साहेबांनी निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून एक वेळेस लोकसभेला व दोन व वेळेस विधानसभेला निवडणुकीत उभा करून विश्वास टाकला.१९९० ते १९९५ दरम्यान आमदार म्हणून काम केले. मतदारसंघात गाव पातळीवर माझा संपर्क आहे.सर्व जाती धर्मात मानणारा वर्ग आहे.पवार साहेबांच्या अडचणीच्या काळातही साथ सोडली नाही.पक्षाच्या वाढीसाठी प्रयत्न केला आहे. लोकसभा निवडणुकीत पक्षाने दिलेल्या उमेदवाराला निवडून आणण्यात कार्यकर्ता म्हणून कष्ट घेतले आहे.संपूर्ण मतदारसंघात गाव पातळीवर आमचा कायम संपर्क आहे.या शिदोरीवर येत्या विधान सभेच्या मैदानात आम्ही उतरणार आहोत.त्यामुळे एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून मीच उमेदवार असणार!असा विश्वास मला आहे.पक्षप्रमुख पवार यांनी मला उमेदवारी देऊन आशीर्वाद दिल्यास जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने मीच आमदार होणार असल्याचा विश्वास ही पाटील यांनी व्यक्त केला.दरम्यान पक्षाकडं इतर कोणाच्या उमेदवारीची आपण शिफारस केली नसल्याचे त्यांनी सांगून,पक्ष देईल त्या उमेदवाराचा आपण प्रचार करणार असल्याची कबुली त्यांनी यावेळी प्रसिद्धी पत्रकातून दिली आहे.



- बीड विधानसभेत राजेंद्र मस्के पेक्षा कुंडलिक खांडेंना मराठ्यांची जास्त पसंती!
- कुंडलिक खांडेकडे मराठा समाजासह दलित मुस्लिमांचे मतदानाचा आकडा हा एक लाखापर्यंत जाऊ शकतो!
- राजेंद्र मस्के म्हणजे घरका नाघाट का अशी परिस्थिती मस्केंची झाल्यामुळे कार्यकर्तेही फुटण्याच्या वाटेवर? कुंडलिनी खाडे च्या संपर्कात!
- राजेंद्र मस्के समर्थक नाराजीचा सूर व्यक्त करत कुंडलीक खांडे यांना पसंती देण्याच्या तयारी!
- बीड जिल्हा भाजपमधील खाडेना बीड विधानसभेत मदत करण्याची तयारी राजेंद्र मस्केला कंटाळलेले अनेक कार्यकर्ते कुंडलिक खांडेच्या संपर्कात!
- राजेंद्र मस्के म्हणजे मला मला पहा फुलव्हाच!
- लोकसभा निवडणुकीनंतर कुंडलिक खांडेवर झालेला अन्याय हे बीड विधानसभेतील जनतेने उघडया डोळ्याने पाहिला आणि त्यामुळे कुंडलिक खांडे च्या मागे मोठ्या संख्येने जनसमुदाय उभा राहत आहे.!
- कुंडलिक खांडे भविष्यातील पंकजाताई मुंडे यांच्या भाजपचा जिल्हाध्यक्ष होणार होते परंतु राजेंद्र मस्के सहविरोधकांनी केलेल्या कुरघोडीने कुंडलिक खांडे ना अडचणीला सामोरे जावे लागले पण बीड विधानसभेत कुंडलिक खांडे ना अच्छे दिन.!
- राजेंद्र मस्केंनी अनेकांची बोलबच्चन करून केली बोळवण ती आता महागात पडणार!
- राजेंद्र मस्के चं डिपॉझिट ही जप्त होईल यामध्ये तीन मात्र शंका नाही!
- बीड विधानसभेमध्ये अठरापगड जातीच्या लोकांना सुखदु:खामध्ये धावून येणारा कुंडलिक खांडेचा जनता दरबार पाहून राजेंद्र मस्केच्या बुडाला आग लागली यामध्ये मात्र शंका नाही.?

बीड (प्रतिनिधी)

बीड विधानसभेमध्ये अनेकांना बीडचा आमदार मीच म्हणून डोहाळे लागलेले आहेत याचाच एक भाग म्हणून बीड जिल्हा भाजपाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी काही दिवसापूर्वी घोषणा केलेली आहे बैलगाडा शर्यती सहमत मोठे कार्यक्रम घेऊन पैशाच्या जोरावर धन बांगड्यांचा धंदा आता बीड विधानसभेतीलच नव्हे तर महाराष्ट्रातील जनता बंदच करणार आहे. याचाच एक भाग म्हणून मराठा समाजामध्ये कुंडलिक खांडे यांना जास्त पसंती मिळत आहे .याचं कारण असं आहे की कुंडलिक खांडेंवरती गेल्या काही दिवसापूर्वी राजकीय देशातून गुन्हे दाखल करून जेलमध्ये घालण्यासाठी कोण जबाबदार आहे अशी चर्चा विविध बीड विधानसभेत होत असतानाच यावेळी कुडलिक खांडे यांचे विरुद्ध षडयंत्र रचनेसाठी भाजपचे विद्यमान जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह अनेक विरोधक फक्त बीड विधानसभेमध्ये दावेदार असलेल्या कुंडलिक खांडेना खाली कसे खेचायचं यासाठी विरोधकांनी एकत्र येऊन षड्यंत्र पंकजाताई मुंडे प्रीतम ताई मुंडे तसेच स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या विश्वासू व निकटवर्तीयांमध्ये कुंडलिक खाडेचे नाव या अगोदर मोठ्या प्रमाणात होते. परंतु एका रेकॉर्डिंग मुळे कुंडलिक खांडे यांचे जिल्हाध्यक्ष पद हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे च्या शिवसेनेने काढून घेतले खरे परंतु ही रेकॉर्डिंग खरी होती किंवा खोटी होती याची तपासणी करणे गरजेचे असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व बीड जिल्हा भाजपच्या काही टीमने म्हणजेच पदाधिकाऱ्यांनी कुंडलीक खांडेंना विरोध म्हणून त्या ठिकाणी आपली यंत्रणा वापरून पोलिसात गुन्हे दाखल करायला सुरुवात केली. खरी परंतु कुंडलिक खांडे हे बीड विधानसभेमध्ये मराठा समाजाचे नेते १८ पगड जातीतील पसंतीचा चेहरा आहे. कुंडलिक खांडे यांचे मराठा समाजातील ५० ते ६० हजार मतदान असून या ठिकाणी जर दलित मुस्लिम समाजाच्या सह विविध छोट्या-छोट्या जाती धर्मातील लोकांच्या सुखदु:खामध्ये जाऊन जाण्याची सवय कुंडलिक खांडेंना आहे ही सवय त्यांची विरोधकांना आवडली नाही का असा प्रश्न या बीडच्या विधानसभेतील जनतेमध्ये सध्या चर्चा जोर धरू लागली आहे. बीड विधानसभेमध्ये कुंडलिक खांडे यांनी जनता दरबार घडवला तर त्या ठिकाणी हजारोची गर्दी होते आणि त्या हजाराच्या गर्दीमधील चेहरा म्हणजे कुंडलिक खांडे आहे. त्यामुळे कुंडलिक खांडेला आता बीडची जनता आमदार करणार असल्यामुळे राजेंद्र मस्के यांचे धाबे दणाणले आहेत. राजेंद्र मस्के बीड भाजपा मध्ये परिस्थितीमध्ये घरकांना घाट का झाली आहे. पंकजाताई मुंडे सोबत राजेंद्र मस्के ना आता एकत्र राहण्याचा राजेंद्र मस्के हे प्रयत्न करत आहेत. परंतु राजेंद्र मस्के यांनी काही दिवसापूर्वी बैलगाडा शर्यतीवर बॅनर बाजी केली होती. काही दिवसांपूर्वी बीड शहरांमध्ये बैलगाडा शर्यतीची बॅनरबाजी वरती पंकजाताई मुंडेछा बॅनर फोटो आहे त्या बॅनर वरती मनोज दादा जरा पाटील यांचा फोटो नव्हता तर मनोज दादा जरांगे पाटील यांचा ज्या बँनरवर फोटो आहेत त्या बॅनर पंकजाताई मुंडे यांचा फोटो नव्हता तर यावेळी मात्र आता कुंडलिक खांडे यांची बाजू भक्कम झाल्यामुळे राजेंद्र मस्के यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे मराठा समाजाचे अठरापगड जातीतील लोक हे राजेंद्र मस्के पेक्षा कुंडलिक खांडेना जास्त पसंती देत असल्यामुळे येणाऱ्या विधानसभेमध्ये कुंडलिक खांडे हे भविष्यातील बीडचे आमदार असू शकतात हे चित्र आता राजेंद्र मस्के यांना पाहून खूप वाईट वाटत असेल परंतु राजेंद्र मस्के यांनी भाग जिल्हा भाजप टीम मधील वेगवेगळ्या जाती धर्मातील छोट्या छोट्या कार्यकर्त्यांचे गुत्तेदारीचे काम असतील किंवा काही असेल त्यावेळी त्यांनी अन्याय केलेला आहे मराठा समाजासोबत न राहता भाजप सोबत राहून मराठ्यांचा घात केला तर आता मराठ्यांना धरून पुन्हा आता विश्वास करत पुन्हा त्या विश्वासाचा घात करण्याचा एक केविलवाना प्रयत्न राजेंद्र मस्के यांच्याकडून होत असतानाच या ठिकाणी मराठा समाजाची दिग्गज नेते आता बीड विधानसभेमध्ये उतरल्यानंतर यामध्ये कुंडलिक खांडे यांना जास्त पसंती मिळणार आहे.

माजलगाव मतदार संघामध्ये माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांनी सांगितले आहे की मी रमेश आडसकर किंवा अन्य कोणाचेही शरद पवार साहेबांच्या राष्ट्रवादीकडे इकडे तिकडे केलेले नाहीत हे जर खर असेल तर या ठिकाणी रमेश आडसकर हे बाहेरचं पार्सल असल्यामुळे बाहेरच पाठविले जाईल असाही यावेळी माजलगाव मतदार संघात चर्चा ला जोडधरू लागले आहेत परंतु यावेळी जर रमेश आडसकर बाहेर गेले आणि तुतारी जर मोहन जगताप यांना मिळालीच तर या ठिकाणी माजल या मतदारसंघाचे नेतृत्व हे नक्कीच मोहन दादा जगताप हे करतील यामध्ये तीळ मात्र शंका नाही आणि मोहन जगताप यांना मानणारा मोठा वर्ग व २०२४ च्या निवडणुकीमध्ये मोहन दादांना एक संधी माजलगाव मतदार संघातील जनता देण्याच्या तयारीत आहेत त्यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत

# वित्तीय साक्षरता ही काळाची गरज आहे- मा. श्री सावंत मुरहारी

सिरसाळा (प्रतिनिधी)

वित्तीय साक्षरता लोकांना आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जागरूक करते, त्यांना बचत, गुंतवणूक करण्याकरिता प्रवृत्त करते. आर्थिक समर्थता, तसेच आर्थिक व्यवहार चांगल्या पद्धतीने करण्यास साहाय्य करते. ज्यामुळे व्यक्ती व तिच्या कुटुंबाची प्रगती होते. म्हणून वित्तीय साक्षरता काळाची गरज आहे असे मा. श्री सावंत मुरहारी यांनी प्रतिपादन केले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय शिरसाळा ता. परळी (वै) जि. बीड अर्थशास्त्र विभाग आयोजित वित्तीय जागरूकता कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रम अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. पाटील, प्रमुख मार्गदर्शक मा. श्री एम.डी. सावंत, अर्थशास्त्र विभाग प्रमुख तथा संयोजक डॉ बालाजी साबळे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एच. पी. कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. वित्तीय साक्षरते बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा. श्री. सावंत म्हणाले की,

वित्तीय साक्षरतेच्या अभावामुळे अडचणी येतात. वित्तीय सेवांचा त्याला उचित लाभ घेता येत नाही. वित्तीय साक्षरतेत बँकिंग सेवांची माहिती करून घेणे फार गरजेचे आहे. यात बँका कसे काम करतात, त्यांच्या सेवा-सुविधांचा लाभ कसा घ्यावा याचे जे शिक्षण देण्यात येते त्याला बँकिंग अधिकोशीय साक्षरता शिक्षण असे म्हणतात. भारतात अनेक वर्षांपासून विविध बँका बँकिंगविषयक सेवा-सुविधा जनसामान्यांसाठी उपलब्ध करून देत आहेत. बँकेच्या सेवा सुविधा, विविध योजना, कार्यक्रमांची माहिती, बँकेसंबंधी साक्षरता, प्रबोधन, जागरूकता, सुरक्षितता, उपयोगिता इत्यादींची माहिती बँका जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतात. याकरिता केंद्र, राज्य सरकार व इतर संस्थांचे सहकार्य घेतले जाते. वित्तीय-साक्षर व्यक्तीची निर्णयशक्ती वाढते. योग्य माहितीच्या आधारे घेतलेले हे निर्णय योग्य तसेच लाभप्रद होण्याची शक्यताही अधिक असते. व्यक्ती आकस्मिक वित्तीय संकटाचा सामना अधिक प्रबळतेने करू शकते.बँकिंग सेवांचा लाभ घेऊ शकते. कर्जातून मुक्ततेसाठी अशा व्यक्ती सुनियोजित प्रयत्न करतात. बचतीकडे वळतात. उपलब्ध आर्थिक माहितीचा विचारपूर्वक प्रयोग करतात. बँकेची महत्त्वपूर्ण ग्राहक होऊ शकते. कौटुंबिक संपत्ती व आर्थिक सुरक्षा वाढते. या कारणांसाठी वित्तीय साक्षरता अत्यंत आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये बँका बहुउद्देशीय भूमिका पार पाडतात. नागरी आणि ग्रामीण भागातील, लघु व मध्यम उत्पन्न




गटातील व्यक्तींना बँकिंग सवयी लागाव्यात म्हणून बँका प्रयत्नरत आहेत. लघु उद्योजकांना कर्ज सुविधा उपलब्ध करून देणे व स्थानिक लोकांच्या बचती संकलित करण्याचे कार्य या बँका करतात. स्थानिक लोकांशी जनसंपर्क, सहकार्याची भावना यामुळे वित्तीय साक्षरता शिक्षणात बँकिंग शिक्षणास जास्त महत्त्व आहे. भारतीय बँकांनी वित्तीय साक्षरतेसाठी केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार राष्टीय अभियान चालवले आहे. सर्वस्तरातील लोकांना वित्तीय व बँकिंग सेवा-सुविधा कार्यकक्षेत आणणे. बचतीची सवय व उत्पन्न-खर्च यांच्या नियोजनास प्रेरित करणे. बँकिंग क्षेत्रांबाबत विश्वास निर्माण करणे. साक्षरता शिक्षणामध्ये सहभागी होऊन स्तर उंचावण्यास साहाय्य करणे. विविध वित्तीय सेवा-सुविधांची माहिती देणे. बँकांचे साक्षरता व शिक्षणकार्य : वित्तीय साक्षरतेच्या कक्षा रुंदावण्याच्या दृष्टीने बँकांनी विशेष योजना सुरू केली आहे. ज्या क्षेत्रांमध्ये अन्य बँकांच्या शाखा नाहीत अशा ठिकाणी शाखा उघडून बँकिंग सेवा सुरू करणे. माहिती तंत्रज्ञानाचा (वेबसाइट, कोअर बँकिंग, मोबाइल बँकिंग, एटीएम इ.) उपयोग करून बँकिंग सेवासुविधा उपलब्ध करून देणे. इंटरनेट बँकिंग, बिझनेस फॅसीलेटर व बिझनेस सुविधांचा कक्षा विस्तार. वित्तीय साक्षरता-प्रकल्प जाहिराती गाव दत्तक योजना, ग्रामविकास अभियान, केंद्रीय आदर्श ग्राम, शेतकरी, शिक्षण, प्रशिक्षण संपर्क-ग्राहक मित्र इत्यादी. एटीएम, किसान क्रेडिट कार्ड, जनरल क्रेडिट कार्ड त्याचा उपयोग व वित्त-साक्षरतेसाठी व्यक्तींना प्रेरित करावे लागेल आणि याकरिता विशेष अभियान चालवावे लागेल असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.के. पाटील यांनी स्टॉक मार्केट शेअर बाजार गुंतवणूक गुंतवणुकी नंतर येणाऱ्या समस्या सर्वसामान्यांचे होणारे नुकसान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. ए. साबळे यांनी केले. आभार प्रदर्शन प्राध्यापक श्रीकांत गव्हाणे यांनी केले. उत्कृष्ट सूत्रसंचालन डॉ. संजय फुलारी यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी मोलाचे सहकार्य केले.

## विद्यार्थ्यांनी मोबाईल सोडून वाचनात मग्न व्हावे - श्रीमती प्रज्ञा सौंदरमल

उपळी (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील उपळी येथील उपळी हायस्कूल उपळी येथे दि.१५ ऑक्टोबर रोजी भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती आणि वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक भागवत बडे सर हे होते. तर व्यासपीठावर शाळेतील शिक्षक वृंद उपस्थित होते. याबाबत अधिक माहिती अशी की बुधवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी वडवणी तालुक्यातील उपळी येथील उपळी हायस्कूल मध्ये डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मुख्याध्यापक भागवतराव बडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली वाचन

प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील इंग्रजी विषयाच्या शिक्षिका श्रीमती प्रज्ञा सौंदरमल मॅडम यांनी विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना प्रज्ञा सौंदरमल मॅडम यांनी डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनातील विविध किस्से विद्यार्थ्यांसमोर मांडले यावेळी बोलताना त्या

म्हणाल्या की, एकदा डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या शिक्षकांनी त्यांना




शिक्षा केली होती. त्या शिक्षेमुळे त्यांनी मन लावून आपण इथून पुढे चांगल्या प्रकारे अभ्यास करून वर्गात सर्वात जास्त गुण घेऊन पुढे जायचे पुढे ते प्रचंड अभ्यास केल्यामुळे सतत टॉपर राहिले.त्यांच्याप्रमाणेच विद्यार्थ्यांनीही मनामध्ये प्रचंड अभ्यास करून आपण सातत्याने टॉपर रहावे असा विचार केला पाहिजे. नुसता विचार न करता जर कृती केली. तर तुम्ही शाळेत किंवा वर्गातच नव्हे तर संपूर्ण जीवनात ही सदैव टॉपर राहू शकाल असा विश्वास प्रज्ञा सौंदरमल मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण केला. शिवाय विविध उदाहरणे गोष्टी सांगून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर शाळेचे पर्यवेक्षक शंकर घाडगे यांनी सुद्धा डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या विविध आठवणी सांगून विद्यार्थ्यांना मंत्रमुक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गणित विषयाचे तज्ञ श्री प्रकाश गोरे सर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तसेच विद्यार्थ्यांनी मोलाचा सहभाग घेतला.

## महिलांनी भूलथापांना बळी पडून रेशनकार्ड ब्लॉक करून घेऊ नये - एस.एम.युसूफ़

### ५० रुपयांचा फॉर्म भरून दरमहा ५ हजार रुपये मिळण्याची अफवा

बीड (प्रतिनिधी)

गेल्या काही दिवसांपासून शहरात एक अफवा जोरात फिरू लागली आहे, ती म्हणजे पन्नास रुपयांचा फॉर्म भरून दिल्यास रेशन कार्डधारकांना शासनाकडून दरमहा पाच हजार रुपये मिळणार. असं काहीही शासनाकडून किंवा प्रशासनाकडून अधिकृतरित्या अजूनपर्यंत तरी कळविण्यात आलेले नाही. शिवाय आता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झालेली आहे. यामुळे या काळात आता कोणतीही नवीन योजना शासन-प्रशासनाकडून अंमलबजावणीसाठी येण्याची दुरान्वयेही शक्यता नाही. यामुळे रेशन कार्डधारकांनी अशा अफवांना बळी पडू नये आणि आपले रेशन कार्ड ब्लॉक करून घेऊ नये. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.




याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, राज्य शासनाने जेव्हापासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेद्वारे महिला भगिनींना दरमहा पंधराशे रुपये देण्यास सुरुवात केली, तेव्हापासून सातत्याने काही ना काही योजनांच्या नवनवीन अफवा उडू लागल्या आहेत. यात रेशन कार्डधारक महिलांना दरमहा पाच हजार रुपये मिळणार. दरमहा दीड हजार रुपये आले की नाही हे पाहण्यासाठी अँड्रॉइड मोबाईल नसलेल्या महिलांना शासनाकडून अँड्रॉइड मोबाईल मिळणार. उज्वला गॅस योजनेची जोडणी असलेल्या महिलांना तीन मोफत सिलेंडर सह अजून एक जास्तीचा गॅस सिलेंडर मोफत मिळणार वगैरे अफवांचा बाजार गरम झालेला आहे. सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने उडविलेल्या अफवांच्या कोणत्याही योजना अमलात तर येणार नाहीतच शिवाय मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून देण्यात येणारे दरमहा पंधराशे रुपये सुद्धा आता विधानसभा निवडणुकीनंतर नवीन सरकार स्थानापन्न झाल्यावर नवीन सरकारने ही योजना पुढे चालू ठेवण्याची घोषणा केल्याशिवाय ते सुद्धा महिला वर्गाला मिळतील की नाही याची शाश्वती नाही. तेव्हा महिला वर्गाने कोणत्याही अफवांना, आमिषांना बळी न पडता कुणालाही कुठलाही फॉर्म भरून न देता, तहसील कार्यालय बाह्य कुठलेही ऑनलाइन काम करू नये. काही बनवेगिरी करणारे लोक कोणतेतरी फॉर्म पन्नास रुपये घेत ते भरून त्याचा काहीतरी ऑनलाईन कुटाणा करत असल्याचे चर्चिले जात आहे. ज्या महिला या फॉर्म भरून ऑनलाईन कुटाणा करीत आहे. त्यांचे रेशन कार्ड ब्लॉक होत असल्याचेही बोलले जात आहे. ब्लॉक झालेल्या या महिलांचे रेशन कार्ड पूर्ववत कोण सुरू करून देणार? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. या प्रकरणात पुरवठा विभागासह तहसील प्रशासन, पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन या सर्वांनी दक्ष राहून कारवाई करण्याची गरज आहे. या मागील अष्टमकुष्टम काय आहे? कोण अशा प्रकारे महिलांना मुर्खात काढून ५० रुपयांसाठी त्यांचे रेशन कार्ड ब्लॉक करत आहे? याचा सोक्षमोक्ष किंवा छडा लावण्याचे कार्य करणे आवश्यक आहे. अन्यथा अनेक गोरगरीब महिलांचे रेशनकार्ड ब्लॉक होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही बाब लक्षात घेऊन रेशनकार्ड विषयी उडविण्यात आलेल्या अफवांना बळी पडू नका. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

## अंशत: अनुदानित शाळांना डिसेंबर २०२४ पुर्वी संच मान्यता द्या

### बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीची मागणी

**बीड (प्रतिनिधी)**

**मागील काही दिवसांपुर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारने घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना २० टक्के टप्पा वाढ देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. सोमवार दि.१४ रोजी त्यासंबंधीचा शासन आदेश सुद्धा शासनाने काढला आहे. हे अनुदान वितरित करताना शासनाने शैक्षणिक वर्ष सन २०२४- २५ ची संच मान्यता लागू केली. त्यामुळे या सर्व शाळांना वाढीव टप्पा अनुदान मिळवण्यासाठी शैक्षणिक वर्ष सन २०२४ -२५ ची संच मान्यता असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ ची संच मान्यता डिसेंबर पूर्वी जनरेट करून वितरित करावी अशी मागणी बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी माध्यमिक आणि प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिका-यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली. याबाबत अधिक माहिती अशी की राज्यातील विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना अनुदानाचा वाढीव टप्पा**



**मिळावा. यासाठी मागील कित्येक दिवसापासून विना अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने राज्यात आंदोलन करण्यात आले.**

शाळा कृती समितीच्या वतीने वेळोवेळी पाठपुरावा करून देखील शासनाने टप्पा वाढी संदर्भात निर्णय घेतला नाही. त्यामुळे विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने पावसाळी अधिवेशनाच्या आधीपासून आंदोलनाला सुरुवात केली. पावसाळी अधिवेशनात शिक्षण मंत्री यांनी अनुदानाचा टप्पा देण्यासंदर्भातली विधिमंडळात घोषणा केली. परंतु अनुदानापासून या शिक्षकांना पुन्हा वंचित ठेवण्याचा शासनाने जाणून-बुजून प्रयत्न केल्याचे या घोषणेवरून लक्षात येताच

विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने कोल्हापूर येथील शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने सनदशीर मार्गाने ७० दिवस धरणे आंदोलन केले. या ७० दिवसांत कृती समितीच्या वतीने वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला. अखेर तब्बल ७० दिवस धरणे आंदोलन केल्यानंतर आंदोलनाच्या ७१ व्या दिवशी शासनाने विना अनुदानित शाळा कृती समितीच्या आंदोलनकर्त्या शिक्षकांना न्याय देण्याची भूमिका घेत गुरुवार दि. १० ऑक्टोबर २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळाने घेतलेल्या बैठकीत

२०% टप्पा वाढीचा निर्णय घेतला. या शासन निर्णयानुसार राज्यातील प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक व वर्ग तुकडया यांना पुढील २०% वाढीव टप्पा अनुदान ०१ जून २०२४ पासून देण्यात यावे व सदरचे अनुदान शैक्षणिक वर्ष सन २०२४-२०२५ ची संच मान्यते मधील मान्यपदांना देण्याबाबत निर्णयामध्ये नमूद केले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष सन २०२४-२०२५ मधील ३० सप्टेंबर २०२४ रोजीची पटसंख्या ग्राह्य धरुन राज्यातील सर्व शाळांची संच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यता शासनाने जनरेट करुन डिसेंबर २०२४ पर्यंत द्या अशी मागणी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने माध्यमिक आणि प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिका-यांना दिलेल्या निवेदनाद्वारे विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजीनगरचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, छत्रपती संभाजी नगरचे निरीक्षक विजयसिंह शिंदे, बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ, जेष्ठ मार्गदर्शक बापुराव घुले बाळासाहेब सानप, नामदेव मुंडे प्रल्हाद कुलकर्णी, सुरेश कदम,राजेश गदळे यांनी केली. यावेळी शाळा कृती समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गेवराई तालुक्यातील संजयगांधी व श्रावणबाळ योजनेतील बोगस लाभार्थ्यांचा पर्दाफाश..!

### बोगस निराधार लाभार्थ्यांची होणार चौकशी - जिल्हाधिकारी पाठक

### शासनाची फसवणूक करून बोगस लाभार्थ्यांना लाभ देणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शासनाने गोरगरीब वयोवृद्ध निराधारांना आणि दिव्यांगाना मदतीचा हात मिळावा यासाठी संजयगांधी निराधार आणि श्रावणबाळ योजना सुरू केलेली आहे. परंतु खऱ्या अर्थाने या योजनेचा लाभ वयोवृद्ध निराधारांना आणि दिव्यांग लाभार्थ्यांना न मिळता, काही दलालांकडून ज्यांना लाभ देता येते नाही. अशा लाभार्थ्यांना लाभ मिळवून देत आहे. हा सगळा बोगस आणि सावळा गोंधळ गेवराईच्या तहसील मध्ये उघडकीस आला आहे. मागील काही दिवसांपूर्वी गेवराई तहसील मध्ये संजयगांधी व श्रावणबाळ योजनेची बैठक घेऊन त्यामध्ये १२ हजार लाभार्थ्यांची मंजूर यादी समितीकडून प्रसिद्ध करण्यात आली होती. तर त्या यादीमध्ये तहसील प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी व समितीने सावळा गोंधळ करून वयोवृद्ध निराधारांना डावलून बोगस लाभार्थीची निवड केली आहे. याप्रकरणाचा सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ ने निर्भीड लेखणीतून बातमी प्रकाशित करून आवाज उठवला होता. त्या बातमीची दखल घेऊन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी चौकशीचे आदेश गेवराई चे तहसीलदार यांना दिले आहेत. यामुळे गेवराई तालुक्यातील



वंचित असलेल्या वयोवृद्ध आणि दिव्यांगांना न्याय मिळणार असल्याने समाधान व्यक्त केले आहे. यावर काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच बोगस लाभार्थ्यांना खोट्या कागदपत्रांच्या आधारे बोगसगिरी करून शासनाची फसवणूक करून बोगस लाभार्थींना संजयगांधी व श्रावणबाळ योजनेचा लाभ मिळवून देणाऱ्या तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करून निलंबित करण्याची मागणी गेवराई तालुक्यातील वयोवृद्ध आणि दिव्यांग बांधवांकडून होत आहे.

# राज्याच्या घटनात्मक प्रमुखाकडुन राज्यपाल नियुक्त आमदारांची नियुक्ती संविधानाच्या मुळ हेतुला हरताळ फासणारी

## राष्ट्रपतींना निवेदन:- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

राज्यपाल हे राज्याचे घटनात्मक प्रमुख आहेत.तर मुख्यमंत्री हे कार्यकारी प्रमुख. राज्याचे सगळे आदेश आणि निर्णय राज्यपालांच्या नावाने निघतात.कारण ते राज्याचे घटनात्मक प्रमुख आहेत.अनुच्छेद १६४ प्रमाणे राज्यपाल हे मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील सदस्यांची नियुक्ती करतात आणि म्हणूनच मुख्यमंत्री आणि मंत्र्यांचा शपथविधी हा कायम राज्यपालांद्वारे केला जातो. राज्यपालांनी विधानपरिषदेवर कोणाची नियुक्ती करायची याचे काही निकष आहेत.सहकार समाजसेवा, साहित्य, विज्ञान, क्रीडा, पत्रकारिता आशा क्षेत्रातील मान्यवरांना राज्यपालांनी विधानपरिषदेवर नियुक्ती द्यावी अशी सर्वसामान्य जनतेची अपेक्षा असुन तशी संविधानात तरतूदही आहे. बुद्धीजीवी मंडळी निवडणुकीच्या मैदानात टिकाव धरू शकत नाहीत त्यामुळे अशांची नियुक्ती करण्यात यावी असे निकष असताना संविधानाच्या मुळ हेतुला हरताळ फासत राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी समाजसेवा, साहित्य,क्रिडा, विज्ञान, पत्रकारिता या क्षेत्रांचा कसलाही गंध नसलेल्या चित्रा वाघ, विक्रांत पाटील,बाबुसिंग महाराज



राठोड, पंकज भुजबळ,इद्रीस नायकवडी, हेमंत पाटील,मनिषा कायंदे या राजकीय मंडळींची विधानपरिषदेवर नियुक्ती करण्यात आली असुन याबद्दल जनसामान्यांच्या मनात तिव्र संतापाची भावना असुन राज्यपाल हे जरी घटनात्मक पद असले तरीही त्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतात म्हणून यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना लेखी निवेदनाद्वारे जनभावना कळवल्या आहेत.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७१ मध्ये ज्या राज्यांमध्ये विधानपरिषद आहे.त्यात किती सदस्य असावेत आणि त्याचे निकष काय असावे ठरवलेले आहे.या अनुच्छेदाप्रमाणे विधानपरीषदेची सदस्य संख्या हि विधानसभेच्या सदस्य संख्येच्या १/३ असली पाहिजे.महाराष्ट्राच्या विधानसभेची सदस्य संख्या २८८ आहे.यानुसार महाराष्ट्र विधानपरीषदेची सदस्य संख्या ९६ असायला पाहिजे मात्र ती ७२ आहे. ही सदस्य संख्या २४ ने कमी का आहे याची कारणे ज्ञात नाहीत. महाराष्ट्रात राज्यपाल नियुक्त सदस्यांची संख्या हि १२ आहे.राज्यपाल नियुक्त सदस्यांना सहकार चळवळ, साहित्य, विज्ञान किंवा समिजसेवेचा विशेष अनुभव किंवा ज्ञान असले पाहिजे असं आपलं संविधान सांगते. मात्र संविधानाच्या मुळ हेतुलाच हरताळ फासून राजकारण्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

अनुच्छेद १६३ प्रमाणे मुख्यमंत्री आणि मंत्रीपरीषदेचे काम राज्यपालांना सल्ला देण्याचे असले आणि निर्णय जरी मंत्रीमंडळाने घेतलेला असतो तरी त्याचे आदेश हे कायम राज्यपालांच्या नावाने निघतात. राज्यपालांना मंत्रीपरीषदेचे निर्णय सहसा बंधनकारक असले तरी काही निर्णयांमध्ये राज्यपाल आपला विशेषाधिकार/ स्वतंत्र अधिकार वापरू शकतात.आणि त्या आधिकाराला कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येत नाही. राज्यपाल नियुक्त सदस्य ही राज्यपालांची अशीच एक ताकद आहे. असे असतानाही राज्यपाल पद हे रबरी शिक्का बनुन राहीले असुन सत्ताधारी पक्षाकडुन त्यांचा हवा तसा वापर करून घेण्याची प्रथा क्लेशदायक आहे.



## लोकनेत्याच्या प्रचारार्थ युवानेत्याचा सिरसमार्ग गाव भेट दौरा

आज मौजे सिरसमार्ग येथे विधानसभा निवडणूकीच्या प्रचारार्थ शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकर) पक्षाचे अधिकृत उमेदवार मा. बदामराव आबा पंडीत यांची निशाणी मशाल हे चिन्ह घरा घरात पोहोचवून आबांना आमदार करण्यासाठी सर्वानी मतदान करावी अशी विनंती युव नेते युधाजित दादा पंडित यांनी केले. या बैठकीस युवा नेते युधाजित दादा पंडित, शिवसेना उप जिल्हाप्रमुख महादेव औटी, किसान सेना तालुकाप्रमुख सतिश सपकाळ, अल्पसंख्याक तालुकाप्रमुख शेख तय्यबभाई, मा. उपनगराध्यक्ष अमोल करांडे, उप तालुकाप्रमुख दिनकर शिंदे सर संचार उमाप भारत कोळेकर रितेश मुळे राहुल रडे अमर उमाप ऋषी नेमाने आदेश उमाप दिनकर उमाप संतोष खोड भास्कर मार्केट दीपक तांबारे विठ्ठल नाना सम्राट सह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचा मीच उमेदवार!

## मी कोणाची शिफारस केली नाही; .माजी आ.राधाकृष्ण होके पाटील

**माजलगाव ।सुनिल थोरात**

**माजलगाव विधानसभेच्या मैदानात उतारण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून आमची प्रबळ दावेदारी आहे.पवार साहेबांच्या आशीर्वाद मिळाल्यास मीच उमेदवार राहणार आहे.असा आत्मविश्वास माजी आ.राधाकृष्ण होके पाटील यांनी व्यक्त केला. दरम्यान इतर कोणाच्या उमेदवारीची शिफारस मी पक्षाकडं केली नाही,असी माहितीही त्यांनी यावेळी प्रसिद्धी पत्रकातून दिली.**

यावेळी दिलेल्या प्रसिद्धी पत्राकाद्वारे त्यांनी सांगितले कि, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दुभागल्या नंतर आम्ही पक्षाला बळकटी देण्याचे काम केले.इतर कोणात्याही गटाच्या प्रलोभाला बळी न पडता शरदचंद्रजी पवार यांच्या अडचणीच्या काळातही मी सक्षमपणे पक्षासोबत उभा राहिलो. मागच्या ३५ वर्षापासून कार्यकर्ता म्हणून काम करत आहे.पवार साहेबांनी निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून एक वेळेस लोकसभेला व दोन व वेळेस विधानसभेला निवडणुकीत उभा करून विश्वास टाकला.१९९० ते १९९५ दरम्यान आमदार म्हणून काम केले. मतदारसंघात गाव पातळीवर माझा संपर्क आहे.सर्व जाती धर्मात मानणारा वर्ग आहे.पवार साहेबांच्या अडचणीच्या काळातही साथ सोडली नाही.पक्षाच्या वाढीसाठी प्रयत्न केला आहे. लोकसभा निवडणुकीत पक्षाने दिलेल्या उमेदवाराला निवडून आणण्यात कार्यकर्ता म्हणून कष्ट घेतले आहे.संपूर्ण मतदारसंघात गाव पातळीवर आमचा कायम संपर्क आहे.या शिदोरीवर येत्या विधान सभेच्या मैदानात आम्ही उतरणार आहोत.त्यामुळे एक निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून मीच उमेदवार असणार!असा विश्वास मला आहे.पक्षप्रमुख पवार यांनी मला उमेदवारी देऊन आशीर्वाद दिल्यास जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने मीच आमदार होणार असल्याचा विश्वास ही पाटील यांनी व्यक्त केला.दरम्यान पक्षाकडं इतर कोणाच्या उमेदवारीची आपण शिफारस केली नसल्याचे त्यांनी सांगून,पक्ष देईल त्या उमेदवाराचा आपण प्रचार करणार असल्याची कबुली त्यांनी यावेळी प्रसिद्धी पत्रकातून दिली आहे.

# आझाद क्रांती सेनेच्या वडवणी ता.सचिवपदी मंगेश शिंदे यांची निवड

वडवणी (प्रतिनिधी)

आझाद क्रांती सेनेची पाळेमुळे हळू हळू महाराष्ट्रामध्ये रुजायला सुरुवात झाल्याने कार्यकर्त्यांच्या चेह-यावर आंनद दिसुन येत आहे.आज दि १६-१०-२०२४ रोजी आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व वडवणी ता प्रमुख महादेव आवाड यांच्या साक्षीने आझाद क्रांती सेनेच्या वडवणी ता सचिवपदी मंगेश शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली.यावेळी मंगेश शिंदे यांचा शाल श्रीफल व फेटा बांधुन मोठा सत्कार राजेश घोडे यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी तालुक्यातील आझाद क्रांती सेनेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मंगेश शिंदे यांनी




सांगीतले की वडवणी तालुक्यातील सर्व सहकारी यांना सोबत घेऊन गाव तिथं शाखा करण्यासाठी प्रयत्न करणार आसल्याचे यावळी मंगेश शिंदे यांनी सांगीतले.आझाद क्रांती सेनेच्या माध्मातुन सर्व सामांन्याचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सुद्धा प्रयत्न करणार आहे.यावेळी आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे,ता प्रमुख महादेव आवाड,ऊसतोड कामगार ता प्रमुख सतीश हाणवते,धारुर ता प्रमुख बळीराम मस्के, भागवत शिंदे, बप्पा शिंदे,अंकुश आडागळे, यांच्या सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते

# केज मतदारसंघामध्ये तुतारीची स्पर्धा साठे घाडगे ठोंबरे मध्ये रस्सीखेच सुरूच

केज (प्रतिनिधी)

केज विधानसभा मतदारसंघ राखीव असला तरी येथे उमेदवारीसाठी मोठी स्पर्धा पाहायला मिळते. सध्या तरी भाजपा कडून विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांना भाजपातून कोणी स्पर्धक नाही. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी मोठी स्पर्धा पाहायला मिळते आहे. १२ इच्छुकांनी मुलाखती दिल्या असल्यातरी पक्षाच्या लेव्हलवर माजी आ. संगीता ठोंबरे, पृथ्वीराज साठे आणि डॉ. अंजली घाडगे यांची नावे आघाडीवर असून, या तिघांमध्ये तुतारी वाजविण्यासाठी स्पर्धा लागलेली आहे. परंतु पवार साहेब कोणाला उमेदवारी देणार याकडे मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.



पालटिकल मा.आ. संगीता ठोंबरे, पृथ्वीराज साठे, डॉ. अंजली घाडगे यांची नावे आघाडीवर महाराष्ट्र विधानसभा सार्वजनिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून मंगळवार पासून राज्यात आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. मतदानासाठी एक महिन्याची वेळ आहे. तरीही मात्र अद्याप चित्र स्पष्ट नसल्याने इच्छूक उमेदवार पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाकडे डोळे लावून बसलेले आहेत. उमेदवारी घोषित झाली तर 'वेळ कमी अन् सोंगं जास्त' असे चित्र आहे. लोकसभा निवडणुकीत आघाडीने महायुतीला राज्यात चांगलीच धोबीपछाड दिली आहे. यामुळे सर्वाधिक लक्ष आहे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाकडे आहे. महायुतीत अनेक ठिकाणी इच्छुकांना उमेदवारी मिळणार नसल्याने बरेच जण तुतारी हाती घेण्यासाठी इच्छूक आहेत. बीड जिल्ह्यातील केज मतदारसंघ एससी साठी राखीव आहे. तरीही येथून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुकांची भाऊगर्दी आहे. येथे महायुती कडून भाजपाच्या विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांना कोणीही प्रतिस्पर्धी नसल्याने त्यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. परंतु केज विधानसभा मतदारसंघावर मुंदडा कुटुंबाचे वर्चस्व राहिले असले तरी त्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर बहुतांश विळी विजयी झालेल्या आहेत. यामुळे या मतदारसंघातून थोरल्या पवारांना मानणारा मोठा वर्ग असल्याने तुतारी वाजविण्यासाठी इच्छुकांची मोठी स्पर्धा पाहायला मिळते आहे. मागे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाने इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या तेंव्हा केज मतदारसंघातून तब्बल १२ जणांनी मुलाखती दिल्या आहेत. यावरून येथील गर्दीचा अंदाज येतो. असे असले तरी सध्या पक्षाच्या लेव्हल वर केवळ तीन नावे चर्चेत असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. या तिघांमध्ये माजी आमदार संगीता ठोंबरे, पृथ्वीराज साठे आणि डॉ. अंजली घाडगे या तिघांमध्ये स्पर्धा लागलेली आहे. माजी आ. साठे हे पूर्वीपासून पक्षातच आहे. तर शरद पवार गटाची यात्रा केज येथे आली असता त्यावेळी डॉ. अंजली घाडगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटात प्रवेश केला. तर माजी आ. संगीता ठोंबरे या सध्याही भाजपातच असल्यातरी त्या तुतारीसाठी इच्छूक आहेत. त्याही दोन दिवसात प्रवेश करु शकतात अशी चर्चा आहे. त्यांची त्या दिशेने वाटचाल सुरू असून, चर्चा अंतिम टप्प्यात असल्याचे सुत्रांनी सांगितले आहे. यामुळे केज मतदारसंघात तुतारीची उमेदवारी नेमकी कोणाला मिळणार याकडे केज मतदारसंघातील मतदारांचे लक्ष लागले आहे.

# संगीता ठोंबरे येत्या दोन ते तीन दिवसांत होणार 'राशप' मध्ये इंन्ट्री

केज (प्रतिनिधी)

विधानसभा निवडणूक आता जाहीर झाली असून येत्या २० नोव्हेंबरला प्रत्यक्ष मतदान होणार आहे. आणि २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. मागच्या दोन ते तीन महिन्यांपासून अनेक इच्छुक उमेदवारांच्या केज विधानसभा मतदार संघात घिरट्या सुरू होत्या. मात्र त्यामध्ये आता केवळ तीन ते चार जण दिसून येत असून यामध्ये सर्वात अग्रेसर डॉक्टर अंजली घाडगे ह्या ठरलेल्या आहेत. मात्र मागच्या २०१४ ते १९ मध्ये ज्यांनी केज विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले अशा माजी आमदार संगीता ठोंबरे यांनीही काही मोजक्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन मतदार संघामध्ये गाठीभेटी घेतलेल्या आहेत. मात्र २०१९ मध्ये भाजपाने त्यांना तिकीट नाकारल्यामुळे त्या केवळ नावालाच भाजपामध्ये असल्याचे दिसून आले. यावेळेस विधानसभेची निवडणूक लढवायची असा त्यांनी निश्चय केलेला आहे. परंतु निवडणूक कोणत्या पक्षातून लढवायची याची चाचपनी त्या करत होत्या. परंतु आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षामध्ये जाण्याचा त्यांनी निर्णय घेतलेला दिसत असून येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये डी.डी.बनसोडे केज दि. १६ विधानसभा निवडणुकीचे रणसिंग फुंकले गेले - आहे. मागच्या अनेक महिन्यांपासून निवडणूक कधी होणार याची उत्सुकता राजकीय पक्षांसह इच्छुक उमेदवारांना लागली होती. आणि आता त्यावर पडदा पडला असून येत्या दोन चार दिवसांमध्ये अनेक इच्छुक उमेदवार पक्ष बदलण्याच्या तयारीत असून यातच केज विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार संगीता ठोंबरे या सुद्धा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षामध्ये येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये डेरे दाखल होण्याची शक्यता आहे.

त्या राशपामध्ये अधिकृत प्रवेश करतील असे स्पष्ट संकेत आहेत.

माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी त्यांच्या आमदारकीच्या कार्यकाळात काही योजना कार्यान्वित केल्या तर काही योजनांना मंजुरी मिळवून आणली. मात्र त्याची उद्घाटने हे त्यांच्यानंतर प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदारांनी केले संगीता ठोंबरे यांनी केज तालुक्यामध्ये सूतगिरणी सारखा प्रकल्प उभा केला असून त्याच्या माध्यमातून बऱ्यापैकी फायदा त्यांना होईल असे त्यांना वाटत आहे. २०१४ मध्ये जेव्हा त्या आमदार झाल्या त्यावेळेस माजी मंत्री पंकजा मुंडे यांची मोठी ताकद त्यांच्या मागे होती. आणि पंकजा मुंडे यांचे हुकमी मतदान आपसूकच संगीता ठोंबरे यांच्या पारड्यात पडले होते. मात्र आता परिस्थिती वेगळी असून पंकजा मुंडे यांची ताकद ही त्यांच्या विरोधात असणार असून संगीता ठोंबरे यांना स्वबळावरच लढाई लढावी



लागणार आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी नेमका त्यांना काय शब्द दिलाय ? आणि त्या कोणत्या अटीवर राशपमध्ये प्रवेश करत आहेत ? हे केज विधानसभा मतदारसंघाचे तिकीट जाहीर झाल्यानंतरच दिसून येणार आहे.

# बंडोबांना थंड करण्यासाठी महामंडळांची लॉटरी

## २७ जणांना महामंडळावर संधी; कल्याण आखाडे, प्रशांत परिचारक यांचा समावेश

बीड (प्रतिनिधी)

ऐन विधानसभा निवडणुकांच्या राजी नाराजी नाट्यापूर्वीच अनेकांचे बंड धमवण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे. त्यामध्ये, महाराष्ट्र राज्य सहकार कृषी पणन मंडळाच्या अध्यक्षपदी भाजप नेते प्रशांत परिचारक आणि बीड जिल्ह्यातील ओबीसी नेते व सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांची महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. राज्यातील २७ जणांना हांडळावर संधी देण्यात आली आहे.

राज्य सरकारने याच महिन्यात मंत्रिमंडळ ठकीत महत्त्वाचे निर्णय घेतले होते, त्यामध्ये विविध महामंडळांच्या निर्माणाची घोषणा केली होती. त्यात, परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना ३ ऑक्टोबर २०२४ रोजी शासन निर्णय (नियोजन विभाग) कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम ८ मधील तरतुदीनुसार करण्यात आली होती. त्यानुसार आज आशिष दामले यांची निवड करण्यात आली तर तुषार पवार आणि बापू भेगडे यांची महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील कलम १२

(२) () मधील तरतुदीनुसार संदर्भ क्र. १ अन्वये ही निवड करण्यात आली आहे. दरम्यान, महामंडळावर निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी अभिनंदन केले आहे. तर, पंडरमधून विधानसभेसाठी इच्छुक असलेल्या भाजपच्या प्रशांत परिचारक यांना सहकार कृषी पणन महामंडळाच्या अध्यक्षपदी संधी देण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील ओबीसी नेते कल्याण आखाडे ंना संधी देण्यात आली असून यांची महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या उपाध्यक्षपदी वर्णी लावण्यात आली आहे. त्यामुळे निष्ठावंताला उपमुख्ंत्री अजित पवार आणि कृषींत्री धनंजय मुंडे ंनी न्या दिला आहे.

महाराष्ट्र रोजगार हमी परिषद शहाजी





पवार, अध्यक्ष, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ दिलीप कांळे, अध्यक्ष, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक समिती सचिन साठे, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग- सतीश डोगा अध्यक्ष, मुकेश सारवान उपाध्यक्ष, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ निलय नाईक, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ अरविंद पोरड्डीवार, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार कृषी पणन मंडळ प्रशांत परिचारक, अध्यक्ष, मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळ इद्रिस मुलतानी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य यिाणे महामंडळ प्रमोद कोरडे, अध्यक्ष, महाराष्ट्र कृषी शिक्षण

राज्यातील २७ महामंडळांवर नियुक्त्या आणि संशोधन परिषद प्रमोद कोरडे, अध्यक्ष, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र

राज्य मेंढी व शेळी विकास महामंडळ - विजय वडकुते अध्यक्ष, ाळासाहे किसवे, संतोष महात्मे उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पेट्रोकेमिकल्स महामंडळ अतुल काळसेकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ राजेश पांडे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य गोपीनाथ मुंडे ऊस तोड कामगार मंडळ गोविंद केंद्रे, अध्यक्ष, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) - ळीराम शिरसकर, सदस्य, राजे उमाजी नाईक आर्थिक विकास मंडळ दौलत शितोळे, उपाध्यक्ष, महाराष्ट्र वन विकास महामंडळ अतुल देशकर, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक वेतन समिती नरेंद्र सावंत, अध्यक्ष, महिला आर्थिक विकास महामंडळावर (माविम) मिनाक्षी शिंदे, अध्यक्षा, राणी द्विवेदी, उपाध्यक्ष, आदिवासी विकास महामंडळ काशिनाथ मेंगाळ, अध्यक्ष, कै मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ विजय चौगुले, उपाध्यक्ष, आण्णासाहे पाटील आर्थिक विकास महामंडळ, मुंई अजय बोरस्ते, उपाध्यक्ष, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भाऊसाहे चौधरी, उपाध्यक्ष, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळांवर - आनंद जाधव, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ - कल्याण आखाडे, उपाध्यक्ष, राज्य कंत्राटी कामगार सल्लागार मंडळ श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ग्राहक संरक्षण परिषद संदीप लेले अध्यक्ष, अरुण जगताप उपाध्यक्ष



# राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत पुन्हा एकदा माजलगावचा दबदबा

## पैलवान सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी

माजलगाव (प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासन अंतर्गत राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा २०२४-२५ (१९ वर्षाखालील - फ्रीस्टाईल) ता. १४/१५ ऑक्टोंबर २०२४ रोजी बाबुजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी, जि. अहमदनगर येथे पार पडल्या. छत्रपती संभाजी नगर विभागातून ७० किलो वजन गटातून आलेला पै. सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर याने ३ राऊंड खेळून फाइनल कुस्ती १०-० अश्या मोठ्या फरकाने विजय मिळवत राज्यात पुन्हा एकदा कुस्ती प्रकारात माजलगाव चा दबदबा कायम ठेवत सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला आहे.

पैलवान सुमितकुमार सध्या माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात शिकत असून, रुस्तुम ए हिंद पै. अमोल बुचूडे कुस्ती केंद्र पुणे येथे कुस्तीचे प्रशिक्षण घेत आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकाचा मानकरी ठरलेला पै. सुमीतकुमार याची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून उत्तरप्रदेश मेरठ येथे होणाऱ्या स्पर्धेत पुन्हा एकदा महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणार आहे. तसेच महारष्ट्राला या राष्ट्रीय स्पर्धेत सुमितकुमार राज्याला सुवर्णपदक मिळून देणार का, याकडे आत्ता सर्वांचे लक्ष वेधले आहे. तसेच, या अभूतपूर्व यशाबदद्दल पै. सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर याने सुवर्णपदक जिंकून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरल्याने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य,क्रीडा विभागाचे प्राध्यापक श्री आवारे सर, पुणे येथील प्रशिक्षक, वस्ताद व आई वडील यांच्यासह तालुक्यातील सर्वसामान्य लोकांसह जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# बीडच्या भूमिपुत्राची यशस्वी घोडदौड: देवानंद वीर यांची अन्न औषध उपआयुक्त पदी बढती, मित्रपरिवाराचा शुभेच्छांचा वर्षाव

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरातील मूळ रहिवासी आणि पाली गावाचे सुपुत्र श्री. देवानंद गोपाळराव वीर यांची अन्न औषध उपआयुक्त पदावर पदोन्नती झाली आहे. ते रायगड येथे अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळत होते, आता त्यांची बढती अकोला येथे उपआयुक्त म्हणून झाली आहे.

देवानंद वीर यांनी यापूर्वी अमरावती, नांदेड, बीड, पुणे आणि मुंबईसारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे आणि निःपक्षपाती कारवायांमुळे त्यांना हे महत्त्वाचे पद मिळाले आहे.त्यांच्या या यशस्वी प्रवासामुळे संपूर्ण बीड शहरात आनंदाचे वातावरण असून, पत्रकार, मित्रपरिवार,नातेवाईक, व्यापारी आणि शुभचिंतकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

# जिल्हा परिषद महासंघाच्या प्रयत्नातुन पशुधन कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजुर : बळीराम उबाळे . डॉ संभाजी जाधव

प्रतिनिधी । बीड





दिनांक १५ / १० / २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ जिल्हा शाखा बीड यांच्या अथक प्रयत्नांनी पशुवैद्यकिय अधिकारी कर्मचारी यांचा चार ते पाच वर्षापासून रखडलेला जिव्हाळ्याचा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजुर झाला आहे १० . २० . ३० . वर्ष ज्यांची सेवा पुर्ण झाली आहे तसेच ज्या कर्मचाऱ्यांची सेवा १० वर्ष पुर्ण झाली आहे . त्यांना एस - १० ची वेतन श्रेणी लागू झाली आहे एकूण कर्मचारी संख्या ९ आहे . ज्यांना २० वर्षे पूर्ण झाले आहे त्यांना एस - १५ चा दुसरा वेतन श्रेणीचा लाभ देण्यात आला आहे . अशी एकूण संख्या ९ आहे . ज्या कर्मचाऱ्यांना ३० वर्षे पूर्ण झाले आहे त्यांन एस - २० चा तिसरा लाभ देण्यात आला आहे . त्यांची कर्मचारी संख्या ३ आहे अश्या एकूण २१ पशुसंवर्धन पर्यवेक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ सातव्या वेतन आयोगानुसार प्रथम द्धितीय तृतीय लाभ मंजुर करण्यात आले आहे बऱ्याच वर्षानी सर्व पशुवैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांना लाभ मंजुर झाल्यामुळे त्यांच्या मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजुर केल्याबद्दल मा मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवणे साहेब मा उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब प्रदिप काकडे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी मा विजय देशमुख साहेब सहाय्यक प्रशासन अधिकारी पशुसंवर्धन विभाग मा प्रवीण येवले साहेब यांनी सहकार्य केल्याबद्दल जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ बीडच्या वतीने बळीराम उबाळे यांनी जाहीर आभार मानले आहे . तसेच १० . २० . ३० चा लाभ मिळवून देण्याकरीता जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्यावतीने जिल्हा अध्यक्ष बळीराम उबाळे सचिव नंदकिशोर परळकर जिल्हा उपाध्यक्ष अशोक चव्हाण कार्याध्यक्ष डॉ संभाजी जाधव कार्याध्यक्ष शिवलाल राठोड यांचे व पशुवैद्यकीय अधिकारी कर्मचारी व सर्व पदाधिकारी यांनी सहकार्य केल्या बद्दल सर्वाचे आभार डॉ संभाजी जाधव यांनी मानले आहे . यावेळेस कोषाध्यक्ष उमेश हुलजुते महिला अध्यक्षा रेखा कवडे सल्लागार भागवत वाघ प्रसिद्धीप्रमुख मकर ध्वज सावंत संघटक विलास बहिरवाळ संघटक जाधव उत्तरेश्वर आरोग्य विभागाचे भारत नागरगोजे . वाहन चालक विभागाचे अनिल गोरे चतूर्थश्रेणीचे अर्जून शेळके आसे महासंघाच्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे सहसचिव प्रदीप बनकर व प्रवक्ते युसूफ पठाण यांनी कळविले आहे

# चोरट्यांनी पळवलेल्या माल वाहतूक टेम्पोचा पोलिसांनी लावला एका तासातच छडा!

## खाकी वर्दीने दाखवले माणुसकीचे दर्शन; सर्वत्र स्तरावर कौतुक

## पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम यांची उत्कृष्ट कामगिरी ; टेम्पोसह एकाला अटक



**गेवराई । प्रतिनिधी**

**जामखेड येथील कांदा मार्केट मधून कांदा भरून ब्राहणपुर येथे खाली करण्यासाठी जात असलेल्या एलपिटी टेम्पो एमएच - २३ -ए यू - ५२२९ हा सोलापूर धुळे हायवेवरील पालीजवळ रोडच्या बाजूला एका हॉटेलवर चालक जेवण्यासाठी थाबला असता, जेवण करून परत गेल्यावर चोरट्यांनी चाकुचा धाक दाखवून सदरील एलपिटी टेम्पो पळविला होता. ही घटना दि.१६ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास घडली होती. टेम्पो चालक यांनी या घटनेची माहिती रात्रीच्या वेळी पेट्रोलिंग करत असलेले पोलीस उपनिरीक्षक निकम यांना देताच त्यांनी जलतगतीने आपल्या तपासाचे यंत्र फिरवून सदरील चोरट्यांनी पळवलेला टेम्पोचा शोध घेतला आणि त्या ठिकाणी धाव घेत टेम्पोसह एकाला ताब्यात घेऊन बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, पाली तलावाजवळ एका हॉटेल वर जेवण्यासाठी थांबले असल्याची संधी साधून तीन चोरट्यांनी टेम्पो चालकाला चाकुचा धाक दाखवून ताब्यातील एलपिटी टेम्पो पळविला होता. जामखेड येथील कांदा मार्केट मधून कांदा भरून ब्राहणपुर राज्य मध्ये प्रदेश येथे खाली करण्यासाठी जात होता. सदरील टेम्पो मध्ये दहा टन कांदा प्रति किलो ३० प्रमाणे ३ लाख टेम्पोसह १८ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला होता. परंतु पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम यांनी जलत गतीने चक्रे फिरवून टेम्पोसह एकाला ताब्यात घेतले असून दोन चोरटे पसार झाले. याप्रकरणी चालक प्रविण शिंदे यांच्या तक्रारीवरून माजेद आबेद शेख व दोन साथीदार यांच्यावर बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नितीन काकरवल हे करीत आहेत.

# लाडकी बहिणीला काँग्रेसचं महालक्ष्मी योजनेने उत्तर

## महिन्याला २ हजार देणार, महाराष्ट्राच्या जाहीरनाम्यासाठी खलबतं सुरु

दै.सांजसुयोग वार्ता । मुंबई



राज्यात कोणत्याही क्षणी विधानसभा निवडणुकीची घोषणा होऊ शकते. लवकरच आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. हीच बाब लक्षात घेऊन राज्यातील महायुती सरकारकडून धडाडीने अनेक निर्णय घेतले जात आहेत.शिंदे सरकारने नुकतेच मुंबईच्या वेशीवरील पाच टोलनाक्यांवरील हलक्या वाहनांचा टोल माफ केला आहे. सरकारच्या या निर्णयाची सगळीकडे चर्चा होत असताना दुसरीकडे काँग्रेस पक्षातही राजधानी दिल्ली मध्ये जाहीरनाम्यावर खलबतं चालू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार सरकार राज्यातील जनतेला अनेक मोठी आश्वासनं देणार असून यामध्ये महायुतीच्या लाडकी बहीण योजनेला, महालक्ष्मी योजनेने उत्तर दिले जाणार आहे.

राजधानी दिल्लीत सध्या काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर चर्चा केली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार महिला, युवक, शेतकरी, कामगार, अनुसूचित जाती, जमाती अशा वेगवेगळ्या प्रवर्गासाठी काँग्रेस अनेक आकर्षक योजना लागू करण्याचे आश्वासन देणार आहे. विशेष म्हणजे या योजनांसाठी नावेदेखील ठरवण्यात आल्याचं म्हटलं जातंय. सध्याच्या महायुती सरकारकडून माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांना प्रतिमहिना १५०० रुपयांची मदत दिली जाते. सरकारच्या या योजनेची सध्या सगळीकडे चर्चा चालू आहे. हीच बाब लक्षात घेता काँग्रेस पक्षदेखील सत्तेत आल्यास राज्यातील महिलांना महालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून प्रतिमहिना २००० रुपये दिले जाण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास या योजनेसाठी साधारण ६० हजार कोटी रुपयांचा निधी अपेक्षित आहे.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास, आम्ही कृषी समृद्धी शेतकरी सन्मान योजना लागू करू, असे आश्वासन काँग्रेस देण्याची शक्यता आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचं ३ लाखापर्यंत कर्ज माफ केलं जाणार आहे. ही कर्जमाफी साधारण २८ हजार कोटींची असेल.

या योजनेअंतर्गत महिलांना बस वाहतूक सेवा पूर्णपणे मोफत चालवली जाण्याचे आश्वासन काँग्रेस देऊ शकते. या योजनेचा समावेश जाहीरनाम्यात केला जाऊ शकते. या योजनेसाठी १ हजार ४६० कोटीचा निधी अपेक्षित आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात कुटुंब रक्षण योजनेचेही समावेश केला जाण्याची शक्यता आहे. या योजनेअंतर्गत सरकार आल्यास काँग्रेसतर्फे सर्वांना २५ लाख रूपयांचं विमा कवच दिलं जाऊ शकतं. या योजनेसाठी ६ हजार ५५६ कोटीचा निधी अपेक्षित आहे.

# मराठी रंगभूमीवरचा हरहुन्नरी तारा निखळला!

दै.सांजसुयोग वार्ता । बीड



अभिनेते अतुल परचूरे यांचे निधन झाले आहे. ते ५७ वर्षांचे होते. त्यांच्या जाण्याने मराठी रंगभूमीला धक्का बसला आहे. अनेक नाटक, चित्रपट आणि मालिकांमध्ये त्यांनी भूमिका केल्या आहेत. त्यांच्या जाण्याने सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

मराठी मनोरंजन क्षेत्रातील लोकप्रिय आणि दिग्गज अभिनेते अतुल परचुरे यांचे वयाच्या ५७ व्या वर्षी निधन झाले. काही महिन्यांपूर्वीच अतुल परचुरे यांना कर्करोग झाला होता.ज्यातून ते बरे झाले होते. मात्र आता त्यांची तब्येत खालावली होती. अतुल परचुरे यांनी नाटक, सिनेमा आणि मालिका या तिन्ही प्रकारात आपला ठसा उमटवला आहे. मराठीसह त्यांनी बॉलीवूडमध्येही आपली स्थान निर्माण केले होते.

# लॉरेन्स बिश्नोईचा ताबा मिळण्यास अडचण

दै.सांजसुयोग वार्ता । मुंबई

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणी लॉरेन्स बिश्नोईची चौकशी होण्याची शक्यता आहे. या हत्ये मागे बिश्नोई गँगचा हात असल्याचे समोर आला आहे. त्यामुळे बिश्नोई गँगचा म्होरक्या लॉरेन्स विश्नोईची चौकशी करण्यासाठी मुंबई पोलिसांचं विशेष पथक साबरमती कारागृहात जाऊन चौकशी करणार असल्याची माहिती मिळत आहे.

पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला हत्याकांडातील मास्टरमाइंड गैंगस्टर लॉरेन्स बिश्नोई यांची गैंग आता महाराष्ट्रात सक्रिय झाली आहे. त्याच्या गँगने सत्ताधारी राष्ट्रवादी पक्षाचे नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या



घडवून आणली. सलमान खानचे जवळचे संबंध असणाऱ्या माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची जबाबदारीही बिश्नोई गँगने स्वीकारली आहे. त्यासंदर्भातच चौकशी करण्यासाठी लॉरेन्स बिश्नोईची चौकशी होण्याची शक्यता आहे. मुंबई पोलिसांचं विशेष पथक साबरमती कारागृहात जाऊन चौकशी करणार आहे.

लॉरेनची पोलीस कोठडी मिळाली यासाठी मुंबई क्राइम ब्रँचकडून सातत्याने प्रयत्न करण्यात आले मात्र त्यांना ती मिळाली नाही. केंद्रीय गृहविभागाने काढलेल्या एका आदेशामुळे मुंबई पोलिसांना लॉरेनची कोठडी मिळण्यात अडचणी येत आहेत येत आहेत. केंद्रीय गृहविभागाच्या या आदेशानुसार लॉरेन्सला एका तुरुंगात दुसरीकडे हलवण्यात प्रतिबंध आहेत.

# महाराष्ट्रात जर एक मंत्री सुरक्षित नाही तर सामान्य माणसाचं काय




**गद्दारांच्या सुरक्षेसाठी पोलीस आहेत का?**

दै.सांजसुयोग वार्ता । मुंबई

येत्या दोन-तीन दिवसांत विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता जाहीर केल्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमधील तीनही घटक पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी आज संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका जाहीर केली आणि महायुतीच्या धोरणावर जोरदार टीका केली. शिवसेना (उद्धवठाकरे) पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी महायुतीच्या जाहिरांतीवर जोरदार टीका केली. राज्यात एकाबाजूला सामान्यांन माणूस विविध अडचणींचा सामना करत असताना सरकारकडून सिनेसृष्टीतील आघाडीच्या कलाकारांना घेऊन मोठ मोठ्या जाहिराती केल्या जात आहेत. पण कितीही जाहिराती केल्या तरी सरकारचा खरा चेहरा लपला जाणार नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

पोलिसांचा वापर गद्दारांच्या सुरक्षेसाठी केला जात आहे. सामान्य माणसाच्या सुरक्षेसाठी किती पोलीस आहेत आणि गद्दारांच्या सुरक्षेसाठी किती पोलीस आहेत ? याची माहिती आरटीआयमधून बाहेर काढली पाहीजे. त्यामुळेच मी उपरोधिकपणे म्हणतो की, सत्ताधाऱ्यांच्या घरात धुणी-भांडी करणाऱ्यांनाही सुरक्षा पुरविली गेली आहे. काही महिन्यांपूर्वी आमचा युवा नेता अभिषेक घोसाळकरची हत्या झाली.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT